दिव्य मराठी

# पाडगावकरांनी सांगितलेल्या कुसुमाग्रजांच्या आठवणींनी गहिवरले नाशिककर

Source: प्रतिनिधी | Last Updated 11:54(28/02/12)



नाशिक: माझा 'जिप्सी' हा पहिला काव्यसंग्रह तात्यांना पोस्टाने पाठविल्यानंतर 'तुमचा काव्यसंग्रह वाचला, आता मी कविता लिहिणे थांबवले तरी चालेल', ही मिळालेली प्रतिक्रिया किती मोलाची होती ते शब्दात सांगणेदेखील अशक्य आहे. त्यांच्या जन्मशताब्दी सोहळ्याला उपस्थित राहता येण्याइतकं आयुष्य मिळाले, हे मी माझे भाग्य समजतो, अशा भावविभोर शब्दात कविवर्य मंगेश पाडगावकर यांनी ऋण व्यक्त करताच प्रेक्षागृह एक क्षण गहिवरले.

कुसुमाग्रज जन्मशताब्दी सांगता सोहळ्यानिमित्त महाकवी कालिदास कलामंदिर येथे आयोजित केलेल्या समारोपाच्या कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते. यावेळी त्यांनी कुसुमाग्रजांच्या अनेक आठवणी सांगत त्यांच्या हिमलाट, अहि-नकुल, स्मृती या विशाखा काव्यसंग्रहातील कवितांचे वाचन केले. तसेच 'विशाखा' काव्यसंग्रहातून भेटलेल्या कुसुमाग्रजांची आठवण सांगितली.

'दिव्य मराठी'चे मुख्य संपादक कुमार केतकर यांनी एका वेगळ्या नजरेने कुसुमाग्रजांचे आणि त्यांच्या साहित्याचे विश्लेषण केले. कुसुमाग्रजांना मी राजकारणी असे संबोधीन. आपल्याकडे राजकारणी या शब्दाचा अर्थ अत्यंत संकुचित व बरेचदा नकारात्मक घेतला जातो. कुसुमाग्रजांना राजकारणी म्हणताना मला हा अर्थ अभिप्रेत नाही. अनेकजण विशेषत: स्वातंत्र्यपूर्व काळात कुठला ना कुठला आदर्श घेऊन राजकारणात उतरले. त्यांनी कुणाची मूल्ये आदर्श मानली असतील? कुणाची जीवनदृष्टी त्यांना मार्गदर्शक वाटली असेल? याचं उत्तर त्या काळच्या लेखकांच्या लेखनाकडे जातं. गांधीजींच्या विचारांनी झपाटलेले वातावरण तयार होत होते त्यावेळी कुसुमाग्रज 13 ते 20 वर्षांचे होते. आपण इथे त्यांच्या कवितेला दाद द्यायला नाही जमलेलो, आपण त्यांच्याप्रती आदर व्यक्त करण्यासाठी आलो आहोत. ज्या विचारातून त्यांची कविता आली आणि ज्या कवितेने जीवनदृष्टी दिली त्या कवितेप्रती, त्यांच्या विचारांप्रती आदर व्यक्त करायला आलो आहोत. अप्रत्यक्षपणे जगाचा परिघ आणि जगाचा विचार मांडणारे कुसुमाग्रज हे त्या अर्थाने राजकीय कवी होते, असे त्यांनी नमूद केले. यावेळी त्यांनी लेखनात अलीकडे आलेल्या उत्तर आधुनिक काळापर्यंतचा मागोवा घेतला. उत्तर आधुनिक, आधुनिक या वादात कुसुमाग्रज कधीच पडले नाहीत, असेही त्यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमाची सुरुवात 'सर्वात्मका शिवसुंदरा' प्रार्थनेने झाली. मराठा हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी ही प्रार्थना सादर केली.

यावेळी व्यासपीठावर रंजना पाटील, चंद्रशेखर धर्माधिकारी, कुमार केतकर, छगन भुजबळ, मंगेश पाडगावकर, डॉ. जब्बार पटेल, विश्वास ठाकूर, लोकेश शेवडे, किशोर पाठक, प्राचार्य हर्षवर्धन कडेपूरकर, विलास लोणारी, दिलीप साळवेका, विनायक रानडे, ना. धों. महानोर, फादर फ्रान्सिस दिब्रिटो, मोहनदास सुखठनकर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आमदार हेमंत टकले यांनी केले.

## न मागताच सगळं मिळतं

हेमंत टकले यांनी भुजबळ यांना भाषणासाठी विनंती करताना ‘आम्ही तुमच्याकडे काहीच मागायचं ठरवलं नाहीय. न मागताच तुमच्याकडून सगळं मिळत असतं’, असे त्यांना उद्देशून म्हणताच हशा पिकला, तर त्यानंतर बोलताना केवळ एक दिवस मराठी दिन साजरा करून मराठीचे कल्याण होईल असे नाही, शासनाने याबाबत अधिक ठोस पावले उचलली पाहिजेत, असे भुजबळ यांनी सांगितले.

## मराठी भाषेसाठी स्वतंत्र विद्यापीठ हवे

मराठी भाषेचा स्वतंत्र अभ्यास करण्यासाठी नाशिकमध्ये सुसज्ज असे स्वतंत्र विद्यापीठ असले पाहिजे, असे डॉ. जब्बार पटेल यांनी सांगून पुढे ‘मला उलगडलेले शिरवाडकर’ या विषयावर बोलताना तात्यांची नाटके वाचल्यावर मनावर आघात होतो, हे त्यांच्या नाट्यलेखनातलं मर्म आहे. नाटककार जेव्हा कवी असतो तेव्हा नाटककार श्रेष्ठ ठरतो, हे तात्यांनीच एकदा सांगितले आहे. आधुनिक रंगभूमीवर काम करणाऱ्यांनी तात्यांची नाटके वेगळ्या अर्थाने पाहण्याची गरज आहे’, असेही त्यांनी नमूद केले.